## वार्षिक सर्व साधारण सभेची नोटीस

### (फक्त सभासदांकरिता)

आपल्या बँकेची ८६ वी वार्षीक सर्वसाधारण सभा रविवार दि. १६.०९.२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता हाजी गुलाम मोहम्मद आझम एज्युकेशन ट्रस्टच्या डॉ. ए. आर. शेख, असेम्ब्ली हॉल, कॅम्प, पुणे येथे पुढील विषयांवर विचार करुन निर्णय घेण्याकरीता आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी सदर सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय**

०१. मागील दि. १०.०९.२०१७ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत मंजूर करणे.
०२. संचालक मंडळाच्या, बँकेच्या कार्याबद्दलचा वर्षाअखेरच्या अहवालावर विचार करणे व तो स्विकृत करणे.
०३. सन २०१७-२०१८ सालाचा वैधानिक लेखापरिक्षण झालेल्या ताळेबंद व नफातोटा पत्रकास स्विकृत करणे.
०४. सन २०१७-२०१८ सालाच्या लेखापरिक्षकांच्या, लेखापरिक्षण अहवालावर विचार करणे व स्विकृत करणे.
०५. सन २०१६-२०१७ चा वैधानिक लेखा परिक्षक, मेसर्स धनराज नोगाजा अँण्ड असोसिएटस्च्या अहवालावर बँकेने दिलेला दुरुस्ती पुर्तता अहवाल वाचून मंजूर करणे.
०६. माननीय संचालक मंडळाने सुचविलेली सन २०१७-२०१८ सालाकरीता, सहकार कायदा व नियम यांस अनुसरुन अहवालात जाहीर केल्या प्रमाणे नफा वाटनीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
०७. सन २०१८-२०१९ सालाकरीता माननीय संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाज पत्रकाची व प्रगतीच्या तक्त्यांची तसेच सन २०१७-२०१८ साली अंदाज पत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
०८. बँकेच्या, संचालक मंडळाने सुचविलेल्या दीर्घकालीन, व्यवसायिक आणि वार्षिक योजनांची, शाखा स्थलांतरासहीत, शाखा विस्तार, व इतर सर्व बाबींची नोंद घेणे व त्यास मान्यता देणे.
०९. सन २०१८-२०१९ सालाकरीता माननीय सहकार आयुक्त व निबंधकांनी प्रमाणित केलेल्या पॅनलवरील वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व शासकिय नियमा नुसार त्याचा मेहनताना ठरविणे व त्यास मान्यता देणे.
१०. सन २०१८-२०१९ सालाकरीता अंतर्गत आणि सतत व समावर्तन (कंकरंट) लेखा परिक्षकाची नेमणूक करणे, त्यांचे मानधन ठरविणे व त्यास मंजूरी देणे.
११. सन २०१८-२०१९ सालाकरीता संचालक मंडळाने सुचविलेल्या आणि बँकिंग व्यवसायासाठी खरेदी व विक्री करिता सादर केलेल्या स्थावर मालमत्तेच्या खरेदी / विक्री करिता सादर केलेल्या स्थावर मालमत्तेच्या खरेदीच्या व्यवहाराच्या तरतुदींची नोंद घेणे व त्यास स्विकृती देणे.
१२. बँकेने सभासदांच्या प्रशिक्षणासाठी अहवाल साली केलेल्या प्रयत्नांची नोंद घेणे तसेच पुढील आर्थिक वर्षात यासाठी योजलेल्या तरतुदींची नोंद घेणे.
१३. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम क्रमांक ४९ नुसार वसुलीचा हक्क अबाधीत ठेऊन मा. वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेल्या बुडीत कर्जाच्या निर्लेखनास मान्यता देणे.
१४. माननीय संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जांची नोंद घेणे.
१५. बँकेने सभासद व सेवक कल्याणा करिता केलेल्या प्रयत्नांची नोंद घेणे तसेच यासाठी केलेल्या कामकाजाचा आढावा घेणे.
१६. सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित सभासदांच्या रजेस मान्यता देणे.
१७. सभासदांकडून येणाऱ्या सुचनांचा विचार करणे व बँकेचे कारभारासंबंधी सर्व साधारण चर्चा करणे.
१८. माननीय अध्यक्षांचे परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**पुणे**
**दिनांक : ३०/०८/२०१८**

**मा. संचालक मंडळाचे आदेशावरून**
**डॉ. हारुन स. सय्यद**
**सचिव-मु. का. अ.**

## विशेष सुचना

१. वर नमुद केलेल्या दिवशी व वेळी गणपुर्ती (कोरम) अभावी सभा तहकूब झाल्यास सदरची सभा त्याच दिवशी व त्याच ठिकाणी सकाळी १०.३० वाजता घेतली जाईल व या तहकूब सभेस गणपूर्तीची (कोरम) आवश्यकता असणार नाही.
२. विषय क्र. १७ संबंधी प्रश्न अथवा सूचना सचिवांकडे दि. ०७.०९.२०१८ चे आत सादर कराव्यात.
३. बँकेच्या वार्षिक अहवाल सर्व सभासदांना पाठविला आहे. तसेच वार्षिक अहवालाची प्रत दिनांक ३०.०८.२०१८ पासुन बँकेच्या सर्व शाखांमध्ये आणि प्रशासकीय कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत उपलब्ध राहिल. तसेच बँकेच्या www.muslimcooperativebank.com या वेब साईट वर उपलब्ध असेल.

Scanned by CamScanner